**शालेय स्तरावर पर्यावरण सेवा योजना राबविण्यासाठी निधी मुक्त करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.३२/तां.क.३
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: १९ मार्च, २०१३

पहावे : (१) या विभागाचे शासन निर्णय क्र.२०१०/प्र.क्र.८/तां.क.३ दि. १४ जानेवारी,२०११; दि. २४ जून, २०११ व दि. २७ मार्च, २०१२

(२) पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे यांचे दि. ९ जानेवारी, २०१३ चे पत्र

**प्रस्तावना :**

सध्या शालेय स्तरावर "पर्यावरण" विषय अनिवार्य करण्यात आला आहे. परंतु, हा विषय केवळ वर्गामध्ये न शिकवता निसर्गाच्या सानिध्यात प्रत्यक्ष कृतीच्या आधारे या विषयाबद्दल मुलांच्या मनात जागृती व चेतना निर्माण करुन, बालपणापासूनच असे आधारस्तंभ तयार करणे गरजेचे आहे. जेणेकरुन भावी पिढी "पर्यावरण संवेदनशील व सजग" होईल. याच उद्देशाने महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये "पर्यावरण सेवा योजना" [Environmental Service Scheme (ESS)] राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. योजनेच्या सुरुवातीस प्रथमत: ३ वर्षाच्या कालावधीसाठी केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत "सेंटर ऑफ एक्सलन्स" म्हणून नियुक्त केलेले "पर्यावरण शिक्षण केंद्र" पुणे (Centre for Environment Education, a centre of excellence designated by MoEF), ही संस्था राज्यस्तरावर पर्यावरण विभागाच्या वतीने योजनेची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल, तरी उपरोक्त कार्यक्रम राबविण्यासाठी सदर संस्थेस तिसऱ्या हप्त्याचा निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शालेय स्तरावर पर्यावरण कार्यक्रम राबविण्यासाठी "पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे" यांना संदर्भाधीन दिनांक २४ जून, २०११ च्या शासन निर्णयाद्वारे रु. ४०.०० लक्ष व संदर्भाधीन दिनांक २७ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे रु. २०.०० लक्ष रोख मुक्त करण्यात आलेले आहेत. आता पुढील हप्ता म्हणून या शासन निर्णयान्वये **एकूण रु. ८९,५५,५०० /- (रुपये एकोणवद लाख पंचावण्ण हजार पाचशे फक्त)** एवढी रक्कम मंजुर व मुक्त करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. मंजुर व मुक्त करण्यात येत असलेल्या रु. ८९,५५,५०० /- निधीबाबत प्रस्तावित खर्चाचे बाबनिहाय मासिक विवरणपत्र तात्काळ सादर करावे.

२. या योजनेतर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत उघडलेल्या स्वतंत्र खात्यात जमा करावा. बँकेत ठेवलेल्या रकमेवर मिळणारे व्याज याच खात्यात जमा करावे.

३. हे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजुर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करावे. योजनेतंर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहीत कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे, ही रक्कम इतर दुसऱ्या कोणत्याही कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळती करता येणार नाही.

४. पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १५ तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील वा खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणाऱ्या पासबुकाची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी. सहायक अनुदानामधून करण्यात येणाऱ्या खर्चाच्या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावे व त्याचे लेखापरिक्षण करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा.

५. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तीचे पालन करणे तसेच संदर्भाधीन दिनांक १४ जानेवारी, २०११ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे "पर्यावरण शिक्षण केंद्र" पुणे यांच्यावर बंधनकारक राहील.

६. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून "पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे" यांना अदा करण्यासाठी आहरण व सवितरण अधिकारी म्हणून श्री. दे. के. मानकर, अवर सचिव, पर्यावरण विभाग, व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. सो. ना. बागुल, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **"पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे"** (Centre for Environment Education, Pune) यांना **रु. ८९,५५,५०० /- (रुपये एकोण्णवद लाख पंचावण्ण हजार पाचशे फक्त)** अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

७. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण,०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध पंचवार्षिक योजनातर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५ १३०२) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१२-१३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात उपरोक्त कार्यक्रमासाठी एकूण रु. ३०५.०० लक्ष एवढी तरतुद मंजुर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे

८. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८७/१४६१ दि. २२/२/२०१३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७०/२०१३/व्यय-१६ दि. ४/३/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१३०३१८१७३१४२८८०४ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(द. के. मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
कार्यक्रम संचालक, पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखापरीक्षा) महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर
संचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग/व्यय-१६ / अर्थसंकल्प-७, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाक/कार्या-१४६१, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
रोख शाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई